# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे-१८

## जाहीर प्रकटन

या जाहीर प्रकटनाद्वारे मौजे भोसरी(कासारवाडी) येथील मिकतधारकांना सुचित करणेत येते की, सुधारीत मंजूर विकास योजनेतील १) पार्श्वनाथ सोसाईटी ते छत्रपती शाहू महाराज विद्या मंदीर ते जयमहाराष्ट्र चौक पर्यंत -१२ मी रूंद रस्ता २) सीएमई हद्दीलगत ९ मी रूंद रस्ता. ३) पार्श्वनाथ सोसाईटी ते बबनराव लांडगे यांचे निवासापर्यंत दक्षिणोत्तर ९ मी रस्ता ४) श्री. बबनराव लांडगे यांचे निवास्थानापासुन ते हिंदवी चौक पर्यंत ७.५ मी रस्ता ५) चंद्राई ऑरचिड सोसाईटी ते सीएमई भिंतीपर्यंत ६ मी रस्ता ६) प्रकाश केमिस्ट स्टोअर ते तातई निवास पर्यत (छत्रपती शाहूमहाराज शाळेपर्यंत) ७ मी ७) मुंबई पुणे रस्त्यापासुन सौ. उषा लांडगे यांचे निवस्थान, छत्रपती चौक, नवजीवन चौक ते शितळादेवी मंदीरापर्यंत -७.५ मी रूंद रस्ता ८) स.नं.४०९ पै मधील आरक्षण क्र.११ शॉपिंग सेंटर आणि मार्केट आरक्षण क्र. १२ रिटेल मार्केट आरक्षणक्र.१४ पोस्ट व तार खाते, ९) स.नं..४३८ पै मधील आरक्षण क्र.३२•वाहनतळ १०) स.नं.५१८,५१९ व ५२० पै या मिळकतीमधील आरक्षण क्र.३३ वखार महामंडळ,आरक्षण क्र.३४ क्रिडा संकूल ,आरक्षण क्र.३५ दवाखाना व प्रस्तीगृह, आरक्षण क्र.३६ पोहण्याचा तलाव, आरक्षण क्र.३७ वाहनतळ व आरक्षण क्र.३८ मनपा उपयोग. यांचे भूसंपादन करणेचे आहे.

तरी या भागातील तमाम मिळकतधारकांना जाहीर आव्हान करणेत येते की, वर नमुद केलेल्या भागातील रस्ता रूंदीकरीता/ आरक्षणाकरीता आवश्यक असलेल्या क्षेत्राचा प्रपत्र अ व ब चे माध्यमातुन आगाऊ ताबा दिल्यास आपणास देय असणारा मोबदला, एफएसआय/टीडीआर/डी.आर किंवा खाजगीवाटाघाटीने मनपाचे प्रचलित नियमाप्रमाणे देणेत येईल. सबब आपण मनपाच्या नावे प्रतिकात्मक ताबापावती मनपा नियमाप्रमाणे करून देणेची आहे. तरी याबाबत छत्रपती शाहूमहाराज विद्यामंदीर येथे दि. २०/१२/२०१८ ते दि.२१/१२/२०१८ रोजी (दोन दिवस) सकाळी १० ते ५.३० पर्यंत आपलेकडील मालकी हक्काची कागदपत्रासह व आपले कुटूंबियाचे ओळखपत्रासह उपस्थित रहावे. सदर ठिकणी आपणास प्रपत्र अ व प्रपत्र ब भरून घेणेची कार्यवाही करणेत येईल. हे काम Mission Mode वर करणेचे असलेने सहकार्य करावे.

जाहिरात क्रमांक २७.
दिनांक ७/१२/१८

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८